महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार . दि. ३ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४२ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१८८२ : प्रसिध्द मराठी कादंबरीकार नाथमाधव यांचा जन्मदिन.

१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणेकशा यांचा जन्मदिन.

१९८४ : भारताचा पहिला अवकाशयात्री राकेश वर्मा यांची दोन रशियन अंतराळवीरांसह अंतराळप्रवासाला सुरुवात.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७३,३१९.५५ | +१८५.२३ (०.२५%) |
| डॉलर | ₹ ९३.०९ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | २२ |
| दिल्ली | ३५ | २३ |
| मुंबई | ३३ | २४ |
| नागपूर | ३५ | २३ |
| पुणे | ३३ | १८ |

### सुविचार

धैर्य आणि संयम हे आपल्या आयुष्याच्या सर्वात मोठ्या शक्ती आहेत. ते आपल्याला कोणत्याही परिस्थितीत शांत आणि केंद्रित ठेवण्यास मदत करतात.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:१९ | संध्या-६:४३ |

**सोने – चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५०,२२०/- | २,५०,०००/- |


# भारत आमचा मित्र, काळजी नसावी

# होर्मुझप्रकरणी इराणचा भारताला दिलासा

## होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांच्या सुरक्षिततेची इराणची ग्वाही

वृत्तसंस्था । तेहरान

**अमेरिका-इस्त्रायल यांनी केलेल्या हल्ल्यानंतर इराणने जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला समुद्री मार्ग रोखून धरला आहे. यानंतर मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्ष सध्या शिगेला पोहोचला असून याची झळ जगभरातील देशांना बसत आहे. यादरम्यान इराणने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टच्या माध्यमातून एक खास संदेश जारी करत होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत भारताला आश्वस्त केले आहे.**



सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर 'इराण इन इंडिया' या हँडलने पोस्ट केली आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की, 'आमचे भारतीय मित्र हे सुरक्षित हातात आहेत, काळजी नसावी'. असाच एक संदेश सौदी अरेबियातील इराणच्या दूतावासाने देखील शेअर केला आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, 'होर्मुझच्या सामुद्रधुनीचे भविष्य फक्त इराण आणि ओमान ठरवतील'. तसेच या पोस्टमध्ये, 'तुम्ही सुरक्षित हातात आहात, काळजी नसावी', असेही म्हटले आहे. (पान २ वर)

### भारत विश्वासू भागीदार

इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फथाली यांनी नुकतेच केलेल्या एका महत्त्वाच्या वक्तव्यानंतर पार्श्वभूमीवर ही पोस्ट करण्यात आली आहे. पश्चिम आशियामध्ये संघर्ष सुरू असला तरी इराण भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देईल, असे फथाली म्हणाले होते. नवी दिल्ली येथे बोलताना फथाली यांनी भारताचा उल्लेख हा इराणचा एक विश्वासू भागीदार म्हणून केला होता. तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करताना भारतीय जहाजांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील एक प्रमुख वाहतूक मार्ग असून, एकूण जगातिल तेल पुरवठ्यापैकी एक मोठा हिस्सा याच मार्गावरून जातो.

# इराण युद्ध सुरू असताना काही गडबड कराल तर पस्तावाल

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंहांचा पाकिस्तानला इशारा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला कडक शब्दात इशारा दिला आहे. काही आगळीक करण्याचा प्रयत्न केल्यास जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, असे राजनाथ सिंह म्हणाले. मध्यपूर्वेत सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी शेजाऱ्यांना इशारा दिला. ऑपरेशन सिंदूर अजून सुरु असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

'आपले शेजारी सध्या अशा स्थितीत आहेत की ते काहीतरी आगळीक करु शकतात. त्यांनी असे केल्यास भारताकडून जोरदार आणि तीव्र स्वरुपाचे उत्तर दिले जाईल. ऑपरेशन अद्याप समाप्त झालेले नाही', असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले. सिंह यांनी यावेळी भाषणात थेट कोणत्याही देशाचे नाव घेण्याचे टाळले. देशात पेट्रोल, (पान २ वर)

### देशात इंधन तुटवडा नाही : राजनाथ सिंह

**केरळममध्ये आयोजित सैनिक सन्मान संमेलन कार्यक्रमात राजनाथ सिंह बोलत होते. इराणच्या होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना भारतीय नौसेना सुरक्षितपणे बाहेर काढून देशात आणत आहे. देशात इंधन तुटवडा असल्याचा दावा राजनाथ सिंह यांनी खोडून काढला. मध्यपूर्वेतील संघर्षावरुन काहीजण विनाकारण अफवा पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असेही सिंह म्हणाले.**

## थोडक्यात

### सचिन तेंडुलकर पुन्हा भारताच्या जर्सीत मैदानावर!

**मुंबई ।** एम एस धोनीच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने मायदेशात वानखेडे स्टेडियमवर दि.२ एप्रिल २०११ ला एकदिवसीय विश्वचषकाचे जेतेपद आपल्या नावे केले होते. आज या ऐतिहासिक दिवसाला १५ वर्षे पूर्ण झाली आहेत. सचिन तेंडुलकरने त्याच्या कारकिर्दीत सहा वेळा ही स्पर्धा खेळल्यानंतर २०११ मध्ये अखेरीस या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं होतं आणि हा प्रसंग सचिनसाठी खूप भावुक करणारा होता. आज १५ व्या वर्धापनदिनानिमित्त सचिन तेंडुलकरने खास पोस्ट शेअर केली आहे आणि टीम इंडियाच्या जर्सीमध्ये फलंदाजी करत हा दिवस सेलिब्रेट केला आहे.

### भारतात स्कॅल्प कुलिंगचा तुटवडा

**नवी दिल्ली ।** कर्करोगावरील किमोथेरपीत वापरल्या जाणाऱ्या स्कॅल्प कुलिंगचा तुटवडा; इराण-अमेरिका, इस्त्रायल युद्धामुळे जहाजे हॉर्मुझच्या आखातात अडकली अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्य युद्धाचा परिणाम आता अधिक प्रकर्षाने जाणवू लागला आहे. विविध आजारांवरील उपचारासाठी भारतात येणाऱ्या नागरिकांच्या संख्येत घट झाली असून आयात करण्यात येणाऱ्या वैद्यकीय घटकांचाही तुटवडा जाणवू लागला आहे.

### अटारी-वाघा सीमेवरील रिट्रीटची वेळ बदलली

**नवी दिल्ली ।** भारत-पाकिस्तान अटारी सीमेवर होणाऱ्या प्रसिद्ध रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. अटारी-वाघा सीमेवर दररोज होणारी ही देशभक्तीने भरलेली सेरेमनी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येतात. नवीन निर्णयानुसार, आता रिट्रीट सेरेमनी संध्याकाळी ५:३० वाजता सुरू होऊन ६ वाजेपर्यंत चालेल.यापूर्वी रिट्रीट सेरेमनी ५ वाजता सुरू होऊन ५:३० वाजता संपत होती.

# जळगाव कृषी विज्ञान केंद्रातील भ्रष्टाचाराचे प्रकरण संसदेत; खा. स्मिता वाघ आक्रमक!

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यातील जळगावच्या कृषी विज्ञान केंद्राचा कथित भ्रष्टाचार, निधीचा गैरवापर आणि प्रशासकीय अनियमिततेचा मुद्दा लोकसभेत जोरदारपणे उपस्थित करत खासदार स्मिता वाघ यांनी केंद्रीय कृषी व किसान कल्याण मंत्रालयाचे लक्ष वेधले. या प्रकरणाची तत्काळ व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी केली.

महात्मा ज्योतीबा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत जळगाव येथील कृषी विज्ञान केंद्रात झालेल्या कथित अनियमितता आणि गैरकारभाराचा मुद्दा आमदार किशोर दराडे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधान परिषदेत नुकताच उपस्थित केला. या





प्रकरणात संबंधित कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांना तातडीने निलंबित करण्याचे निर्देशही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिल्याने मोठी खळबळ उडाली होती. मात्र, कृषिमंत्र्यांच्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, खासदार स्मिता वाघ यांनी थेट संसदेत कृषी विज्ञान केंद्रातील गैरकारभाराकडे कृषी मंत्रालयाचे (पान २ वर)

# राज्यात आजपासून 'महा-साधना सप्ताह'

## ८.८ लाख अधिकारी - कर्मचाऱ्यांची डिजिटल कौशल्यवृद्धी मोहीम

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य प्रशासन अधिक सक्षम, तंत्रज्ञानस्नेही आणि कार्यक्षम बनविण्यासाठी २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'महा-साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा हा उपक्रम शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे.**



केंद्र शासनाच्या सूचनांनंतर राज्यातही या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली असून, 'टेक लर्निंग वीक' अंतर्गत तब्बल ८.८ लाखांहून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यात सहभागी होणार आहेत. सात दिवसांच्या या उपक्रमात प्रत्येकाने iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करून किमान ४ तासांचे ऑनलाइन प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

बदलत्या काळात प्रशासनाला अधिक परिणामकारक बनवण्यासाठी डिजिटल कौशल्ये आणि सतत शिक्षण अत्यावश्यक ठरत आहे. 'महा-साधना सप्ताह' हा त्याच दिशेने उचललेला एक महत्त्वाचा आणि दूरदृष्टीचा निर्णय ठरत आहे.

यामुळे एकूण ३५ लाखांहून अधिक शिकण्याचे तास निर्माण होण्याची अपेक्षा आहे.राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग आणि ६ विभागीय (पान २ वर)

# अशोक खरातच्या मुलाला फिल्मी स्टाईल अटक

## कंपाऊडवरुन उडी मारून बंगल्यात प्रवेश; बायको फरार

वृत्तसंस्था । नाशिक

**राज्यभर गाजत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. नाशिकच्या खरात प्रकरणात आता SIT कडून खरात याच्या मुलाला ताब्यात घेण्यात आलं आहे. अगदी फिल्मी स्टाईल पद्धतीने अशोक खरातच्या मुलाला तपास यंत्रांनी ताब्यात घेतलं आहे.**

कर्मयोगी नगर येथील खरातच्या तृप्तबाला या बंगल्याच्या ठिकाणी आज दि.२ एप्रिल रोजी SIT पथकातील ३ महिला आणि १ पुरुष अधिकारी यांनी बंगल्याचे गेट ठोठावले असता कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर तपास यंत्रणामधील अधिकाऱ्यांनी शेजारी असलेल्या बंगल्याच्या कंपाऊडवरुन उडी मारून बंगल्यात प्रवेश केला आणि त्याच्या मुलाला ताब्यात घेण्यात आलं आहे.



### मुलाला चौकशीसाठी आणलं

खरातच्या मुलाला महाराष्ट्र पोलिस अकॅडमी येथे अधिक चौकशीसाठी आणण्यात आलं आहे. अशोक खरात याची गेल्या १३ दिवसापासून ड्खढ कडून कसून चौकशी सुरू आहे. त्यातच आता त्याच्या मुलाला देखील ड्खढ च्या पथकानं ताब्यात घेतलं आहे. त्यामुळे एसआयटीच्या चौकशीमध्ये आता काय समोर येतं? कोणत्या दिशेने SIT चा तपास हा सुरू आहे? हे बघणं महत्त्वाचं असणार आहे.

### ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाचे थैमान

वृत्तसंस्था । पुणे

महाराष्ट्रात सध्या ठिकठिकाणी सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. कांदा, गहू, हरभरा, डाळिंब व केळीच्या पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस सतर्कतेचा इशारा दिला असून, शेतपिकांचे पंचनामे ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. मागील काही दिवसांपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पडणाऱ्या पावसामुळे शिरूर तालुक्यासह बेट भागातील शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करणार : मंत्री प्रताप सरनाईक




वृत्तसंस्था । मुंबई

**अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे गरजेचे असून अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.**

अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाच्या बांद्रा येथील कार्यालयात मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक झाली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे.

एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा. त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही. तसेच, आर. टी.ओ.च्या सर्व ५९ कार्यालयांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी एसटीने तातडीने कार्यवाही करावी. प्रत्येक संयुक्त कारवाईचा फोटो व लेखी अहवाल मुख्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक असून, निष्क्रिय व जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिला.

- **एसटीने बेकायदेशीर मार्ग व वाहनांची माहिती नियमितपणे संकलित करून आर.टी.ओ. विभागास देणे, संगनमत व गैरप्रकारांविरोधात स्वतंत्र चौकशी समिती नेमणे, तसेच जीपीएस व फोटो रिपोर्टिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी परिवहन विभाग व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने संयुक्तपणे काम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.**

# राज्यात पावसाचा जोर वाढणार? वादळी वाऱ्यासह गारपिटीचीही शक्यता

## हवामानाच्या अंदाजानुसार, ३ ते ५ एप्रिलदरम्यान पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव आणखी तीव्र होणार

वृत्तसंस्था । मुंबई

**यावर्षी महाराष्ट्रासह देशातील हवामानात झपाट्याने बदल होत आहेत. अनेक भागात उष्णतेची लाट सदृश्य परिस्थिती, तर अनेक भागात वादळी वारे, गारपीट आणि पावसाची नोंद होत आहे. दरम्यान, विविध हवामान अहवालांनुसार, ३ ते ५ एप्रिलदरम्यान पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव आणखी तीव्र होणार असून यामुळे देशातील अनेक राज्यात विशेतः उत्तरेच्या राज्यात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.**

हवामान अभ्यासकांच्या मते, एक तीव्र पश्चिमी विक्षोभ भारतीय उपखंडाच्या दिशेने सरकत असून पुढील तीन दिवस विशेषतः भारताच्या उत्तरेच्या राज्यात पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव अधिक असणार आहे. सध्या पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव अरबी समुद्राच्या उत्तरेला आहे. भारताच्या पश्चिम आणि उत्तर भागात शुक्रवारपासून पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव वाढणार आहे.

याचा परिणाम म्हणून जोरदार वादळी वारे वाहण्याची शक्यता असून गारपीट आणि पावसाचे प्रमाणही वाढणार आहे. यामुळे चिंतेत असणाऱ्या बळीराजाच्या समस्येत आणखी वाढ होणार असून अनेक भागात पिकांचे मोठ्या प्रमाणावर (पान २ वर)



शौर्य मराठी — महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



## संपादकीय

### जनगणनेची मोहीम एक महत्त्वाचे पाऊल

गेल्या काही वर्षांतील एका सर्वात मोठ्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय मोहिमेला १ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली आहे. तब्बल १५ वर्षांनंतर देशामध्ये जनगणनेची मोहीम सुरू करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांतील एका सर्वात मोठ्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय मोहिमेला १ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली आहे. तब्बल १५ वर्षांनंतर देशामध्ये जनगणनेची मोहीम सुरू करण्यात आली आहे. जनगणनेतून समोर येणाऱ्या निष्कर्षांच्याच आधारे देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय चेहरा निश्चित होणार असल्याने या मोहिमेला निश्चितच महत्त्व आहे. तसेच समाजातील सर्व स्तरातील घटकांनी या मोहिमेला मनापासून प्रतिसाद देऊन आपली खरी माहिती नोंद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या सुमारे दीडशे वर्षांच्या कालावधीमध्ये आतापर्यंत पंधरा वेळा जनगणना करण्यात आली असली तरी त्यापैकी आठ वेळा जनगणना ब्रिटिशांच्या कालावधीमध्ये झाली होती आणि या कालावधीमध्ये मागवण्यात आलेली माहिती ही इंग्रजांसाठी सकारात्मक किंवा पूरक अशी होती. स्वातंत्र्योत्तर कालावधीनंतरच्या जनगणनेमध्ये फाळणीमुळे झालेल्या विस्थापनाचा प्रभाव दिसून येत होता. त्यानंतरच्या कालावधीमध्ये जनगणनेच्या माध्यमातून भारतीय लोकांच्या गुणवत्तेचा आणि वैशिष्ट्यांचा डाटा गोळा करण्याचे प्रयत्न झाले. २०११ मध्ये सर्वात शेवटची जनगणना झाली होती. खरे तर २०२१ मध्ये जनगणनेचा पुढील टप्पा सुरू होणे अपेक्षित होते. पण कोविड महामारीमुळे ते अशक्य झाल्याने ५ वर्षे उशिरा २०२६ मध्ये ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून उपलब्ध होणारी माहिती निश्चितच महत्त्वाची ठरणार आहे. आधुनिक काळाप्रमाणे या जनगणनेमध्ये विचारले जाणारे विविध ३६ प्रश्न भारतीय लोकांची जीवनशैली स्पष्ट करणार आहेत. शिवाय जातीवर आधारित लोकसंख्या कशा प्रकारे विभागली गेली आहे हेसुद्धा स्पष्ट होणार आहे. आगामी कालावधीमधील भारताची आर्थिक, सामाजिक, राजकीय धोरणे ठरवण्यासाठी हा डाटा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कारण, या जनगणनेतून समोर आलेल्या माहितीच्या आधारेच धोरणे आखली जाणार आहेत. सध्या सरकारच्या पातळीवर ज्या काही योजना राबवल्या जात आहेत किंवा धोरणांची आखणी केली जात आहे त्याला पाया म्हणून २०११ च्या जनगणनेचा आधार घेतला जात आहे. पण गेल्या १५ वर्षांच्या कालावधीमध्ये परिस्थिती खूपच बदलून गेली असल्यामुळे देशाची लोकसंख्याविषयक सद्यस्थिती कशी आहे हे समोर येणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच जनगणनेची ही मोहीम एक महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. यावेळी प्रथमच जनगणना दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यांमध्ये स्वयंगणना होणार आहे. म्हणजे भारतीय नागरिक त्यांच्या इच्छेप्रमाणे स्वतःही काही नोंदी करू शकतील आणि नंतर प्रत्यक्ष घरोघरी जाऊन जनगणना केली जाणार आहे. भारत हा युवा लोकसंख्येचा देश आहे हे नेहमीच बोलले जाते. तसेच भारतातील नागरीकरण वाढत चालले आहे अशा प्रकारचा दावाही केला जातो. पण हे आकडे आणि हे दावे खरे आहेत का हे या लोकसंख्येच्या निष्कर्षानंतर समोर येणार आहे. जनगणनेच्या माध्यमातून समोर येणारी माहिती निश्चितच महत्त्वाची असते. कारण, त्या आधारेच सरकारला निर्णय घ्यावे लागतात. म्हणूनच स्वयंगणनेचा टप्पा असो किंवा प्रत्यक्ष अधिकारी घरोघरी येऊन जनगणना करतील तो टप्पा असो भारतीय नागरिकांनी त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांची खरी आणि योग्य उत्तरे देणे तितकेच महत्त्वाचे आहे. जनगणनेच्या कालावधीमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरांवर आधारितच धोरणाची आखणी केली जाते. त्यामुळे सरकार आपली ही खासगी माहिती का विचारत आहे या शंकेने किंवा भीतीने खोटी माहिती देण्याचा प्रयत्नही केला जाऊ नये.

# शहादा न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार

## हद्दपार कारवाईविरोधात अक्कलकुवा वकील संघ आक्रमक

प्रतिनिधी | कोलवीमाळ

**शहादा येथील वकील ॲड. राहुल कुवर यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या कथित बेकायदेशीर हद्दपार कारवाईच्या निषेधार्थ अक्कलकुवा वकील संघ आक्रमक झाला असून, आज घेतलेल्या तातडीच्या बैठकीत तीव्र संताप व्यक्त करत न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णायक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**



अक्कलकुवा वकील संघाच्या कार्यालयात सकाळी ११:०० वाजता पार पडलेली ही बैठक संघाचे अध्यक्ष ॲड. संग्राम पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत संपूर्ण प्रकरणावर सखोल चर्चा करण्यात आली व संबंधित कारवाई ही केवळ अन्यायकारक नसून वकिलांच्या स्वातंत्र्यावर थेट गदा आणणारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शहादा येथील वकील ॲड. राहुल कुवर यांच्याविरुद्ध कोणतीही ठोस गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना, नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवणकुमार दत्त यांनी सनदशीरपणे वकिली व्यवसाय करणाऱ्या ॲड. राहुल कुवर यांच्या विरोधात दोन वर्षांसाठी हद्दपार प्रस्ताव मंजूर केल्याचा गंभीर आरोप बैठकीत करण्यात आला. ही कारवाई वकिलांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न असून, वकिल वर्गात दहशत निर्माण करण्याचा हेतू असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. बैठकीत अक्कलकुवा वकील संघाचे सचिव ॲड. रुपसिंग वसावे यांनी तातडीच्या बैठकीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती मांडली. तसेच, संबंधित हद्दपार कार्यवाही तात्काळ मागे घेऊन प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. श्रवणकुमार दत्त यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी वकील संघाने केली. यावेळी उपाध्यक्ष ॲड. निशा वसावे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जे. टी. तडवी, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. आर. आर. मराठे, ॲड. राजेंद्र इंदिस, ॲड. आर. टी. वसावे, सह. ॲड. अमरसिंग वसावे, ॲड. डी. एफ. पाडवी, ॲड. रुपसिंग वळवी, ॲड. फुलसिंग वळवी, ॲड. जितेंद्र वसावे, ॲड. शंकर तडवी, ॲड. आमश्या तडवी, ॲड. जे. के. राऊत, ॲड. दिपक वळवी, ॲड. महेश वसावे, ॲड. जितेंद्र वसावे, ॲड. रुपसिंग तडवी, ॲड. सुरेश वसावे, ॲड. सायसिंग पाडवी, ॲड. रामसिंग पाडवी, ॲड. विरसिंग पाडवी, ॲड. राज नाईक, ॲड. नरेंद्र वसावे, ॲड. विजेंद्र नाईक, ॲड. विलास तडवी, ॲड. राज्या पाडवी, ॲड. हिरेसिंग पाडवी हे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सदर निषेध ठरावाची प्रत गृह मंत्रालयापासून पोलीस महासंचालकांपर्यंत सर्व संबंधित शासकीय व प्रशासकीय यंत्रणांना पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

## बनावट दारुसाठी लागणारे नऊ लाखांचे स्पिरीट जप्त

### नंदुरबार गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी | नंदुरबार

अवैधरित्या तयार करण्यात येत असलेल्या दारुसाठी लागणाऱ्या तब्बल नऊ लाखांच्या स्पिरीटचा साठा नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. या कारवाईने अद्यापही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बनावट दारु बनवली जात असल्याचा दाट संशय आहे.

नंदुरबार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना शिरपूर, जि.धुळे येथून कहाटूळमार्गे धडगावकडे एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो वाहनात दारु तयार करण्यासाठी लागणाऱ्या स्पिरीटची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पथकासह सापळा रचला. शहादा शहरातील मामाचे मोहिदा चौफुली परिसरात पांढऱ्या रंगाचे बोलेरो वाहन (एम.एच.०४ इ.एस. ९६५१) ला अडवल्यानंतर त्यातून तब्बल ५५० लिटर स्पिरीट (दारु तयार करण्यासाठी वापरले जाणारे रसायन) जप्त करण्यात आले. या प्रकरणी संशयीत वसंत कुसाल पावरा (२६, रा.बिलगाव, पोस्ट चिखली, ता.धडगाव, जि.नंदुरबार) यास अटक करण्यात आली तर पावरासोबतचा अन्य एक इसम अंधारात पसार झाला. आठ लाख ६५ हजारांचे स्पिरीट व वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींविरुध्द शहादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.



# केवळ स्वत:साठी नाही तर इतरांसाठी जगा

## डॉ. राजेश पाटील यांचे प्रतिपादन; सर्वोत्कृष्ट इंटरॅक्ट क्लब पुरस्काराचे वितरण

प्रतिनिधी | जळगाव

इंटरॅक्ट सदस्य होणे म्हणजे सकारात्मक जीवनाकडचे तुमचे पहिले पाऊल आहे. केवळ स्वतःसाठी नाही तर इतरांसाठी जगा. आपल्या चुका, अपयशातून शिकून प्रगती करीत यशस्वी व्हावे. त्याचबरोबर चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करा. विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या परिवर्तनाची ताकद आहे, असे प्रतिपादन डॉ.राजेश पाटील यांनी केले.



येथील रोटरी क्लब जळगावतर्फे शहरातील क्लबच्या २१ इंटरॅक्ट क्लबमधून सर्वोत्कृष्ट क्लब पुरस्कारचे वितरण करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ.राजेश पाटील, अनुभूती स्कूलच्या संचालिका निशा जैन, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, संवाद सचिव पंकज व्यवहारे, इंटरॅक्ट कमिटी चेअरमन डॉ. काजल फिरके यांची प्रमुख उपस्थिती होती. निशा जैन यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात इंटरॅक्ट क्लब ऑफ जिजामाता माध्यमिक विद्यालयाला इंटरॅक्ट क्लब ऑफ द इयर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. ज्ञान संकल्प एक्सलन्स अवॉर्डने इंटरॅक्ट क्लब ऑफ नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय तर मोस्ट व्हायब्रंट इंटरॅक्ट क्लब अवॉर्डने इंटरॅक्ट क्लब ऑफ का.ऊ.कोल्हे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज यांना प्रदान करण्यात आले.

इंटरॅक्ट क्लब ऑफ श्रीराम हायस्कूलला बेस्ट पार्टीसिपेटिव्ह इंटरॅक्ट क्लब तर धानोरा येथील इंटरॅक्ट क्लब ऑफ झेड.टी.महाजन हायस्कूल यांना आऊटस्टँडिंग कम्युनिटी सर्विस अवॉर्डने गौरविण्यात आले. इंटरॅक्ट क्लब ऑफ या.दे.पाटील विद्यालयाला डीकेड ऑफ डेडिकेशन अवॉर्ड सेवन बाय सेवन बाय सेवन प्रोजेक्टसाठी देण्यात आले. कार्यक्रमात या.दे.पाटील विद्यालयाच्या वर्षा अहिरराव यांच्या तीन हस्तलिखितांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या.दे.पाटील विद्यालयाच्या राशी पाटील या विद्यार्थिनीने इंटरॅक्ट क्लबमुळे आत्मविश्वास व संधी या शब्दांचा अर्थ कळला आणि नेतृत्व विकसित झाले असे मनोगतात सांगितले. प्रास्ताविक गिरीश कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन आदिती कुलकर्णी यांनी केले. रोटरीच्या वॉटर सॅनिटेशन अँड हायजिन महिना व जागतिक जलदिनानिमित्त या.दे. पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अवघ्या दोन दिवसात तयार केलेले जल है तो कल है या पथनाट्याचे सादरीकरण केले. यावर्षी नव्याने स्थापन झालेल्या पाच इंटरॅक्ट क्लबला मान्यवरांच्या हस्ते चार्टर प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास २१ इंटरॅक्ट क्लब असलेल्या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थ्यांची तसेच रोटरी सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ६ एप्रिल रोजी लोकशाही दिन

प्रतिनिधी | जळगाव

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अल्पबचत सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी दिली आहे.तरी नागरिकांनी यापूर्वी तालुका लोकशाही दिनात अर्ज केलेला असेल आणि सदरहू अर्जासंबंधी एका महिन्याच्या आत तालुकास्तरावरुन कोणतेही उत्तर मिळालेले नसेल अशाच हितसंबधाबाबतच्या तक्रारी घेऊन या लोकशाही दिनी उपस्थित राहावे.

## पान १ वरुन

### भारत आमचा मित्र......

इराणकडून होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत वारंवार आश्वस्त केले जात असले तरी जमिनीवरील परिस्थिती गुंतागुंतीची बनली आहे. इराणच्या अधिकाऱ्यांनी अद्याप ही सामुद्रधुनी अधिकृतपणे बंद केली नसल्याचे म्हटले आहे, तरीही सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे या मार्गावरून व्यावसायिक जहाजांच्या वाहतुकीत अनेक आव्हाने निर्माण झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

### जळगाव कृषी विज्ञान केंद्रातील......

लक्ष वेधले. संसदेत बोलताना खासदार वाघ म्हणाल्या की, भारतीय कृषी अनुसंधान परिषद (आयसीएआर) मार्फत कृषी विज्ञान केंद्राला देण्यात येणाऱ्या निधीचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात जळगावच्या विज्ञान केंद्राकडून निधीचा अपव्यय होत असून, मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. कृषी विज्ञान केंद्राच्या परिसरातील जुनी व उपयुक्त झाडे अनधिकृतपणे तोडण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

### इराण युद्ध सुरू......

डिझेल किंवा गॅसचा तुटवडा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधक इंधन, तेल या विषयावरुन राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### राज्यात आजपासून......

कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी या सप्ताहात सहभागी होणार असून, प्रशासनाच्या सर्व स्तरांवर हा उपक्रम राबविला जाणार आहे.

### राज्यात पावसाचा जोर......

नुकसान झाले आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि गुजरात आदी राज्यांमध्ये पावसाची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील स्थिती काय असेल ? - राज्यातील अनेक भागात पावसाळी हवामान कायम असून अनेक भागांना गुरुवारी हवामान विभागाकडून यलो अलर्ट, तर काही भागांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

### हिंदू जनजागृती समितीतर्फे ४० ठिकाणी गदा पूजन

## हिंदू राष्ट्र स्थापनेसाठी बलोपासना आवश्यक!

प्रतिनिधी | जळगाव

श्री हनुमान जयंती निमित्ताने आज शहरासह ग्रामीण भागातील एकूण ४० श्री हनुमान मंदिरात गदा पूजन करण्यात आले. तसेच सकाळी ६ वाजता पंचमुखी हनुमान मंदिरात भाविकांच्या उपस्थितीत गदा पूजन झाले.




यानंतर श्री अन्नदाता हनुमान मंदिर दानाबाजार येथे भाजप प्रदेश राज्य सचिव भैरवी पलांडे, दाणाबाजार व्यापारी असोसिएशनचे अशोक धूत, नगरसेवक विजय बांदल, राजेंद्र पांडे, दिनेश तिवारी, हिंदू जनजागृती समितीचे निखिल कदम, भाजप युवा मोर्चाचे हर्षल सिखवाल उपस्थित होते. असोदा येथील जागृत देवस्थान समिती, श्रीराम पेठ येथील हनुमान मंदिरात गदा पूजन करण्यात आले. यावेळी ४०० हुन अधिक भाविक उपस्थित होते. श्रीधर नगरातील जागृती हौसिंग सोसायटी, सुप्रीम कॉलनी, चौगुले प्लॉट, छत्रपती शिवाजी महाराज नगर, अयोध्या नगर, भोईटेनगर, खोटेनगर, अष्टविनायक माता मंदिर पिंप्राळा येथे गदा पूजन करण्यात आले.

# लहान भवानींनी वेधले पाळधीकरांचे लक्ष

## प्रतापराव पाटील यांनी देखील खेळली पारंपरिक पाचपावली

प्रतिनिधी | पाळधी, ता. धरणगाव

येथील पारंपरिक धार्मिक वारसा जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र चावदशीच्यानिमित्ताने भवानी मातेचा यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. संपूर्ण गावात श्रद्धा, उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या दिवशी काही भक्तगण भवानी मातेचे स्वरूप धारण करून गावभर फेरी काढत भाविकांना दर्शन देतात, ही अनेक वर्षांची परंपरा आहे. यावर्षी पाळधी खुर्द येथील जय भवानी मित्र मंडळाच्यावतीने भवानी मातेचे आकर्षक पार्ट सादर करण्यात आले. यात तीन लहान भवानी व आठ मोठ्या भवानींचा सहभाग होता. लहान वयातील मुलांनी साकारलेल्या भवानी मातेच्या रूपांनी विशेषतः सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या निरागस भावभावना, पारंपरिक वेशभूषा आणि भक्तिभावाने केलेले सादरीकरण पाहून भाविक भारावून गेले. या लहान भवानींनी गावकऱ्यांच्या मनावर वेगळाच ठसा उमटवला. दरम्यान, गावातील टेकडीवरील भवानी मातेच्या मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभर भाविकांनी पूजाअर्चा करून दर्शन घेतले.



या प्रसंगी जिल्हा परिषद माजी सदस्य प्रतापराव पाटील यांनीही या उत्सवात सहभागी होत भवानींसोबत पारंपरिक पाचपावली खेळून वातावरणात अधिक रंगत आणली. त्यांच्या या सर्वसामान्यांमध्ये मिसळून घेतलेल्या सहभागाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा जय भवानी मित्र मंडळाने जपली असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पीएमश्री केंद्रीय विद्यालयात उच्चस्तरीय पथकाची भेट

प्रतिनिधी | भुसावळ

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पीएम योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयुध निर्माणी परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालयात उच्चस्तरीय पथकाची पाहणी भेट पार पडली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी-२०२० च्या अनुषंगाने शाळेत सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आणि प्रगतीचा या पथकाने सविस्तर आढावा घेतला.

या पाहणी पथकाचे नेतृत्व भारत सरकारच्या संयुक्त सचिव गरिमा श्रीवास्तव यांनी केले. यावेळी प्राथमिक उपशिक्षणाधिकारी स्वाती हावले व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राहुल गायकवाड उपस्थित होते. शाळेचे प्राचार्य डी. एस. नंदेश्वर, मुख्याध्यापक सुरेश नरहिरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवोपक्रमशीलता आणि संशोधनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या पार्कची निर्मिती करण्यात आली आहे. उद्घाटनानंतर पथकाने भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देत विद्यार्थ्यांच्या विविध प्रकल्पांचे सादरीकरण पाहिले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण प्रयोगांचे मान्यवरांनी कौतुक केले. निरीक्षणादरम्यान शाळेतील आयसीटी-सक्षम वर्गखोल्या, इंटरॲक्टिव्ह पॅनेलचा वापर तसेच बाला उपक्रमांतर्गत इमारतीचा शैक्षणिक साधन म्हणून केलेला उपयोग यांचेही विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी प्राचार्य नंदेश्वर यांनी शाळेतील पायाभूत सुविधा, ग्रंथालय, क्रीडा विभाग आणि कौशल्याधारित शिक्षण याविषयी माहिती सादर केली. पीएम योजनेअंतर्गत शाळेला आदर्श संस्थेच्या रूपात विकसित करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना पथकाने सकारात्मक प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले.



## घरकुलचा प्रश्न प्रलंबित; नगरसेविका मेढेंचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी | वरणगाव

**प्रभाग क्रमांक १० मधील सिद्धेश्वरनगर येथील नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नसल्याने स्थानिक नगरसेविका माला मेढे यांनी नगरपरिषद प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना विविध समस्यांबाबत निवेदन दिले होते. मात्र त्या निवेदनाची अद्याप कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. प्रशासनाने मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास १५ एप्रिल रोजी नगरसेविका माला मेढे व त्यांचे पती मिलिंद मेढे यांच्या नेतृत्वाखाली सिद्धेश्वर नगरातील नागरिक वरणगाव नगरपरिषदेसमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला आहे.**



उपोषणादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष व प्रशासनावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सिद्धेश्वर नगर परिसरातील बहुतांश नागरिक आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून मजुरी करून उदरनिर्वाह करतात. गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांचा घरकुलाचा प्रश्न प्रलंबित आहे. तसेच परिसरात रस्ते, गटारी, हॉल यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचीही नागरिकांची तक्रार आहे. यावेळी नगरसेविका माला मेढे, तृप्ती महाजन, नगरसेवक विनोद झोपे, वैशाली चौधरी, लता सुरवाडे, संजवनी वाघ, प्रर्मिला सोनवणे, सुरेखा बावस्कर, लिला इंगळे, जया बोदडे, शोभा भालेराव, रेखाबाई मेढे, कुसुम बोदडे, ज्योती बोदडे, आशा बिऱ्हाडे, अजनाबाई मराठे, शलानाबी शाहा, कुंदन माळी, तेजस जैन, महेश महाले याचे सह दीडशेच्यावर महिला पुरुष मोठ्या संख्देने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# प्रसाधनगृह अस्वच्छ ठेवणाऱ्या ठेकेदाराला तात्काळ नोटीस द्या

## प्रसंगी ठेका रद्द करा : बी.जे.मार्केटमधील समस्यांबाबत महापौर दीपमाला काळे यांचा इशारा

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकेच्या महासभेमध्ये गाजलेल्या प्रसाधनगृह स्वच्छतेच्या प्रश्नावर महापौर दीपमाला काळे यांनी तातडीने पावले उचलली आहेत. दि.१ एप्रिल रोजी महापालिकेत आयोजित विशेष बैठकीत महापौरांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेत, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या शौचालय ठेकेदाराला अंतिम नोटीस देऊन प्रसंगी त्याचा मक्ता रद्द करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.**



महासभेत स्थानिक नगरसेवक तथा शिवसेना गटनेते विष्णू भंगाळे, नगरसेविका अर्चना संजय पाटील यांनी मार्केटमधील प्रसाधनगृहांच्या दुरवस्थेचा प्रश्न उपस्थित केला होता. या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत नवीन व जुन्या बीजे मार्केट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी समस्यांचा पाढाच वाचला. जुन्या बीजे मार्केटमधील कारंजा नादुरुस्त असणे, रात्रीच्या वेळी विद्युत दिव्यांअभावी पसरणारा अंधार आणि त्यातून होणारे गैरप्रकार, ट्रान्सपोर्ट कंपन्यांच्या अतिक्रमणामुळे तुटलेली गेट्स आणि वाहन पार्किंगची समस्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची कमतरता आदी समस्या सांगितल्या. नगरसेवक विष्णू भंगाळे यांनी सांगितले की, शौचालयांच्या अस्वच्छतेमुळे मार्केटमध्ये प्रचंड दुर्गंधी पसरली असून व्यापाऱ्यांना व ग्राहकांना तेथे उभे राहणे कठीण झाले आहे. तर नगरसेविका अर्चना पाटील यांनी मार्केटमध्ये रॅम्प नसल्याने होणारी अडचण आणि सुरक्षा व्यवस्थेच्या अभावामुळे निर्माण झालेला गंभीर प्रश्न मांडला. प्रसाधनगृहात ठेकेदार भंगार साठवून ठेवत असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली. या बैठकीला उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ.चंद्रशेखर पाटील, शिवसेनेचे गटनेते विष्णू भंगाळे, नगरसेविका अर्चना पाटील, आशा पाटील, नगरसेवक अमित काळे, सहाय्यक आयुक्त उदय पाटील, स्वच्छता अधिकारी अनिल कांबळे, पाणीपुरवठा प्रमुख शामकांत भंडारकर, अतिक्रमण विभागाचे संजय ठाकूर, विद्युत विभागाचे संदीप मोरे यांच्यासह आरोग्य, बांधकाम विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. गेल्या १५ वर्षांत आम्हाला समस्या मांडण्यासाठी महापालिकेत कधीही बोलावले गेले नव्हते. महापौरांनी स्वतःहून स्वारस्य दाखवून आमची बाजू ऐकून घेतली, त्याबद्दल आम्ही आभारी आहोत,असे असोसिएशन पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### ➤ महापौरांचे निर्देश

सर्व तक्रारी ऐकून घेतल्यानंतर महापौर दीपमाला काळे यांनी प्रशासनाला पुढील आदेश दिले.

**ठेकेदारावर कारवाई :** प्रसाधनगृहाची स्वच्छता न राखणाऱ्या ठेकेदाराला नोटीस द्या आणि समाधानकारक उत्तर न मिळाल्यास त्याचा ठेका तात्काळ रद्द करून नवीन नियुक्ती करा.
**स्वच्छता अभियान:** महापौरांच्या संकल्पनेतून येत्या शुक्रवारी बी.जे. मार्केटमध्ये विशेष साफसफाई अभियान राबवले जाईल. त्यापूर्वी गुरुवारी अधिकारी प्रत्यक्ष जागेची पाहणी करतील.
**लिफ्ट आणि पायाभूत सुविधा:** मार्केटमध्ये लिफ्ट बसवण्यासाठी तांत्रिक इस्टिमेट (अंदाजपत्रक) तयार करण्याचे आदेश महापौरांनी बांधकाम विभागाला दिले.

## थोडक्यात

### पक्षाला उर्जितावस्था देण्यासाठी काँग्रेसचे संघटन सृजन अभियान

**जळगाव ।** काँग्रेस अद्याप विरोधी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर आलेली दिसत नाही, पक्षातर्फे आता मरगळ झटकून कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहे. पक्षाला ऊर्जितावस्था देण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे आणि नवीन पदाधिकारी, कार्यकर्ते जोडले जावेत, या उद्देशाने काँग्रेसतर्फे जिल्ह्यात दि.३ ते ८ एप्रिलदरम्यान संघटन सृजन अभियान राबविले जात आहे, अशी माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांनी दिली. त्यासाठी ऑल इंडिया काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्याकडून जळगावमध्ये पक्ष निरीक्षक पाठवत आहे. ते पाच, सहा दिवस अभियान राबवून संघटनात्मक महत्त्वाचे निर्णय घेणार आहेत. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीतर्फे निरीक्षक म्हणून प्रमोदकुमार यांची निवड झाली आहे. जळगाव ग्रामीणसाठी जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, शहरसाठी श्यामकांत तायडे यांची तर जिल्हा व शहर निरीक्षक म्हणून साजीद पठाण, के.सी.पाडवी,अरिझ बेग, हरिष रावल यांची निवड झाली.

### दोन घरफोडींचे गुन्हे उघड, तीन अट्टल चोरटे जेरबंद

**जळगाव ।** शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जळगाव शहर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने धडाकेबाज कामगिरी केली आहे. गेंदालाल मिल परिसरातून तीन अट्टल चोरट्यांना अटक करण्यात आली. दि. २३ ते २५ मार्चदरम्यान गेंदालाल मिल भागातील शेख रईस शेख यांच्या घरातून १०,४०० रुपयांची चोरी झाली होती. तपासादरम्यान गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, संशयित आरोपी आदील शेख मजीद, गुफरान शेख करीम, आणि कासिम सैय्यद अली (सर्व रा. गेंदालाल मिल) यांनी ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून डॉ. आंबेडकर रिक्षा स्टॉप परिसरातून तिघांना ताब्यात घेतले.

# अवकाळी पावसाने मध्यरात्री पुन्हा झोडपले!

## शहरात २३ मिलिमीटर पावसाची नोंद

प्रतिनिधी । जळगाव

**गेल्या दोन दिवसांपासून उन्हाचा चढ-उतारानंतर जळगावच्या वातावरणात अचानक मोठा बदल झाला आहे. जळगाव परिसरात तर पावसाने अक्षरशः बॅटिंग केली आहे. मध्यरात्री पुन्हा पावसाने झोडपले असून शहरात २३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, पुढील ४८ तास जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, वादळी वाऱ्यासह गारपिटीची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.**



एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच जळगावकरांना निसर्गाच्या लहरीपणाचा अनुभव येत आहे. १ एप्रिल रोजी कमाल तापमान ३५.६कमाल होते, ते २ एप्रिल रोजी थेट ३८.१कमाल वर पोहोचले. मात्र, त्यानंतर झालेल्या पावसामुळे किमान तापमानात मोठी घट होऊन ते १९.८किमान पर्यंत खाली आले आहे. आर्द्रतेचे प्रमाण ८४ टक्क्यांवर गेल्याने वातावरणात गारवा असला तरी पिकांच्या नुकसानीची धास्ती वाढली आहे. जळगाव शहरातील हवामान केंद्रात २३ मिमी पावसाची नोंद झाली असली, तरी ममुराबाद एस.आर. एफ. केंद्राच्या परिसरात सर्वाधिक २८.८ मिमी पाऊस झाला आहे. गेल्या दोन दिवसांत जिल्ह्यात दोन रॅनी डेज नोंदवण्यात आले आहेत.

### ➤ दोन दिवस गारपिटीचे सावट

हवामान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या दि.३ आणि ४ एप्रिल रोजी जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. केवळ पाऊसच नाही, तर काही भागांत गारपीट होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढणीला आलेला माल सुरक्षित स्थळी हलवावा आणि नागरिकांनी विजांच्या कडकडाटात घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेवा कुटीमध्ये हनुमान जन्मोत्सव साजरा

## ४४१ हनुमान चालिसा पाठ, १६८८० हवन आहुती

प्रतिनिधी । वरणगाव



**ओम सिद्धगुरु नित्यानंद प्रतिष्ठान संचलित रेवा कुटी वरणगाव येथील वासुदेव परिवारातर्फे विविध उपक्रमांनी हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ५ वाजता गणेश आराधना, प्रभू श्रीराम स्तुतीनंतर हनुमान चालिसाच्या प्रत्येक ओवीचे पठण सोबत हवन करण्यात आले. यावेळी प्रत्येकी ११ हनुमान चालिसाचे एकूण ४४१ सामूहिक संगीतमय पाठ करण्यात आले. सोबत हनुमान चालिसा प्रत्येक ओवीचे हवन करण्यात आले. एकूण १६८८० हवन आहुती देण्यात आली.**

यावेळी तुकाराम पाटील, वैशाली पाटील, पेचिमुत्थु नाडर, सिल्वराणी नाडार, डॉ.रवींद्र माळी, विवेक पाटील, सुलोचना पाटील, डॉ. रेणुका पाटील, दिपक फेगडे, मनोज गोसावी, उमेश माळी, कमलेश येवले, कुणाल शिंदे , ज्ञानेश्वर पाटील, चंद्रकांत बढे, बाळकृष्ण चव्हाण, दिनकर पाटील, प्रकाश पाटील, सुचिता येवले, सुनंदा येवले, प्रतीक बोरणारे, श्लोक बोरणारे, आशिष येवले, वेदांत पाटील, दुर्वांग पाटील, गौरी येवले, आशिष येवले, सतीश जंगले, राहुल माळी, सुनीता चौधरी, चेतन झोपे, आकाश भंगाळे, सारंग जोशी, अनिकेत चव्हाण आदी आदी भाविक मोठ्या संख्येने सहभागी होते. शेवटी प्रसाद भोजन झाल्यावर आभार प्रदर्शन दीपक फेगडे यांनी मानले.

हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधत आलेल्या भाविकांसाठी प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला रामसेतू दगड दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. ७ हजार वर्षापूर्वी घडलेल्या रामायणातील रामसेतू दगड अजूनही पाण्यात तरंगत असून भाविकांसाठी हा हनुमान जन्मोत्सव कायम स्मरणात राहणार आहे. या तीर्थाचे प्राशन करत सर्व भक्त आनंदी झाले. भाविकांचा वाढता उत्साह संजीवनीसारखा असून राहुल माळी दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सुरू केलेले संगीतमय हनुमान चालिसा पठणाला आता वर्षपूर्ती झाली आहे. भाविकांचा वाढता उत्साह आम्हाला संजीवनी सारखा आहे. आगामी काळात व्यापक नियोजन करू, असे सदस्य राहुल माळी यांनी सांगितले.

# बौद्ध समाजाचा मोफत सामूहिक विवाह सोहळा; वधू-वरांना मिळणार ३० हजारांचे अनुदान

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात प्रथमच दक्षा फाउंडेशन आणि बौद्ध वधू-वर सूचक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील बौद्ध समाजासाठी एका भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गोरगरीब आणि गरजू कुटुंबांतील वधू-वरांना आधार देण्यासाठी हा अत्यंत स्तुत्य उपक्रम पूर्णपणे मोफत राबवला जाणार आहे.**

या सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या वधू-वरांना महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत ३० हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. याशिवाय, नवीन संसारासाठी आवश्यक असलेल्या गृह उपयोगी वस्तू देखील दक्षा फाउंडेशनतर्फे मोफत स्वरूपात भेट दिल्या जाणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे विवाह सोहळ्याचा खर्च करू न शकणाऱ्या कुटुंबांसाठी ही एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. दक्षा फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष उत्तमराव सपकाळे यांनी आवाहन केले आहे की, इच्छुक वधू-वरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी आपली नाव नोंदणी व आवश्यक कागदपत्रे लवकरात लवकर जमा करावीत. नोंदणीची अंतिम मुदत १४ एप्रिल २०२६ पर्यंत दुकान नं. २१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्केट, जिल्हापेठ, जळगाव येथे नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या सोहळ्याचे आयोजन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष आशिष सपकाळे आणि सामाजिक कार्यकर्ते व वधू-वर सूचक केंद्राचे संस्थापक युवराज वाघ यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना सन्मानाने विवाह सोहळा संपन्न करता यावा, हाच यामागचा मुख्य उद्देश आहे, असे मत आयोजकांनी व्यक्त केले आहे. जळगाव जिल्ह्यातील तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील बौद्ध समाजातील वधू-वरांनी या भव्य-दिव्य सोहळ्यात सहभागी होऊन शासनाच्या व सामाजिक संस्थेच्या मदतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाईगिरीला दाखविला पोलिसी खाक्या !

प्रतिनिधी । जळगाव

सोशल मीडियावर स्वतःला भाई म्हणून प्रसिद्धी मिळवण्याच्या नादात एका तरुणाला पोलिसांच्या कारवाईचा फटका बसला आहे. इन्स्टाग्रामवर भाईगिरीची भाषा वापरत रील पोस्ट करणाऱ्या चेतन सोळंके या तरुणाला जळगाव शहर पोलिसांनी ताब्यात घेत कायद्याचा धडा शिकवला. पोलिसांचा खाक्या पाहताच संबंधित तरुणाने हात जोडून माफी मागितल्याची घटना समोर आली आहे. त्याच्यावर शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई केली.

# हितवर्धक संस्था महिला मंडळातर्फे रविवारी रंगणार खेळ पैठणीचा

प्रतिनिधी । जळगाव

**श्री क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था संचलित महिला मंडळयांच्यावतीने महिला जागर भव्य मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती मनोरमाबाई जगताप सामाजिक सांस्कृतिक सभागृह पांजरपोळ टाकी येथे ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वा. केले आहे.**

महिलांसाठी खेळ पैठणीचा आणि होम मिनिस्टर या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रसिद्ध झालेले सूत्रसंचालक ललित खैरनार सटाणा हे उपस्थित राहणार असून स्पर्धांचा थरार रंगणार आहे. दैनंदिन, कौटुंबिक,जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या महिलांना विरंगुळा मिळावा आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, या उदात्त हेतूने संस्थेच्या महिला मंडळच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले असून या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या होम मिनिस्टर स्पर्धेसाठी टीव्हीवरील लोकप्रिय कार्यक्रमाच्या धर्तीवर या स्पर्धेत मनोरंजक खेळ आणि प्रश्नांची रेलचेल असेल. तसेच सरप्राईज गेम्ससाठी उपस्थित महिलांसाठी काही खास आणि अनपेक्षित खेळ खेळले जातील. केवळ मनोरंजनच नव्हे, तर समाजहित जपणाऱ्या आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थितीचे आवाहन महिला मंडळाचे अध्यक्षा माधुरी शिंपी, गीता जगताप, अनिता शिंपी यांनी केले आहे.

# वर्षभरात ५ कोटींचा मुद्देमाल जप्त; १८०० आरोपींना ठोकल्या बेड्या

## जळगाव उत्पादन शुल्क विभागाची दमदार कामगिरी

प्रतिनिधी । जळगाव

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने जळगाव जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात अवैध मद्यविक्री आणि साठवणुकीविरोधात मोठी मोहीम राबवली आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत केलेल्या विविध कारवायांमध्ये विभागाने तब्बल ५ कोटी ३ लाख २० हजार ८८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून १८०० हून अधिक आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.**

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी नुकतीच राज्य उत्पादन शुल्क विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी अधीक्षक डॉ. व्ही. टी. भुकन यांनी वर्षभरातील कामगिरीचा अहवाल सादर केला. या आकडेवारीनुसार, मागील वर्षाच्या तुलनेत यंदा गुन्ह्यांचे प्रमाण आणि जप्त केलेल्या मुद्देमालाच्या किमतीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) जिल्ह्यात २०२९ गुन्हे दाखल झाले होते, तर यंदा (२०२५-२६) हा आकडा २२३८ वर पोहोचला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्याही १५२३ वरून १८१४ झाली आहे.

विशेष म्हणजे, मे २०२५ या एकाच महिन्यात विभागाने १ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मद्यसाठा जप्त करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक २७० गुन्हे दाखल करण्यात आले.

**महसुलात विक्रमी वाढ**

केवळ कारवायाच नव्हे, तर महसूल संकलनातही विभागाने आघाडी घेतली आहे. मद्य विक्रेत्यांचे नवीन परवाने आणि इतर कायदेशीर उपाययोजनांमुळे जिल्ह्याच्या महसुलात मोठी भर पडली आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नवीन वर्षातही ही धडक मोहीम अशीच सुरू राहणार असून अवैध धंद्यांवर वचक बसवण्यासाठी विभागाने कंबर कसली आहे.

### ➤ठळक आकडेवारी

एकूण दाखल गुन्हे: २२३८

अटक केलेले आरोपी: १८१४

जप्त मुद्देमाल किंमत: ५ कोटी ३ लाख २० हजार ८८२ रुपये

सर्वाधिक कारवाईचा महिना: मे २०२५ (१०,७४,८१४० रु. चा मुद्देमाल जप्त)

# डीपीडीसी निधी खर्चात सलग चौथ्या वर्षी राज्यात प्रथम

## पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव ; विकासकामांना गती देत जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा निर्धार

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत निधीच्या प्रभावी नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे जळगाव जिल्हा राज्यात सलग चौथ्यांदा अव्वल ठरला असून, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, आदिवासी घटक व अनुसूचित जाती सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध शासकीय विभागांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ८३४ कोटी ६१ लाख ८९ हजार रुपयांचा संपूर्ण निधी १०० टक्के खर्च करण्यात प्रशासनाला यश आले आहे.**



विशेष म्हणजे, सलग चौथ्या वर्षी हा विक्रम प्रस्थापित झाला आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे व वस्त्र उद्योगमंत्री संजय सावकारे, खासदार व सर्व आमदार यांच्या सहकार्याने जिल्हा प्रशासनाने हे यश प्राप्त केले आहे. भविष्यातही विकासकामांना गती देत जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा निर्धार प्रशासनाने यावेळी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले की, १०० टक्के निधी खर्च हा जनतेच्या विश्वासाचा सन्मान आहे. प्रशासनाने नियोजनबद्ध काम करत हा विश्वास जपला आहे. नियोजन आणि टीमवर्कचा हे यश असून प्रत्येक रुपया हा जनतेचा असून तो योग्य ठिकाणी खर्च झाला पाहिजे, ही प्रशासनाची सतत भूमिका राहिली आहे. सलग चार वर्ष १०० टक्के निधी खर्च करणे ही प्रशासनाची मोठी कामगिरी आहे. यामागे सर्व विभागांचा समन्वय, अधिकारी व कर्मचाऱ्यांची मेहनत मेहनत आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी आहे. आज करण्यात आलेला सत्कार हा केवळ सन्मान नसून, पुढील काळात आणखी चांगले काम करण्यासाठी प्रेरणा आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत चालू आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीचा नियोजनबद्ध वापर करून विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, सर्व विभागांनी समन्वयाने काम करून जिल्ह्याच्या विकासाला यापुढेही हातभार लावावा, असेही आवाहन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. प्रशासनाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये जिल्हाधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे तसेच जिल्हा नियोजन अधिकारी भरत साळुंखे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी योगेश पाटील, यावल प्रकल्प संचालक अरुण पवार व विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश होता. यावेळी संपूर्ण प्रशासनाच्या टीमचा प्रातिनिधिक स्वरूपात गौरव करण्यात आला.

जिल्ह्यासाठी मंजूर निधीपैकी सर्वसाधारण घटकासाठी ६७७ कोटी रुपये, अनुसूचित जाती घटकसाठी ९३ कोटी रुपये आणि आदिवासी घटकसाठी ६४ कोटी ६१ लाख ८९ हजार रुपये असा एकूण ८३४ कोटी ६१ लाख ८९ हजार रुपयांचा निधी पूर्णतः खर्च करण्यात आला. या निधीच्या माध्यमातून विविध विकासकामांना गती मिळत असून, ग्रामीण तसेच शहरी भागात अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. सन २०२६ २७ साठी मंजूर नियतव्य ९०० कोटी सन २०२६ २७ या आर्थिक वर्षात एकूण ९०० कोटी ०५ लक्ष रुपयांचा निधीच्या आराखड्यास शासनाने मान्यता दिली. मागील वर्षाच्या तुलनेत ६५ कोटी ४३ लाख ११ हजार इतक्या निधीची वाढ झालेली आहे.

# चोपडा नगरपरिषदेची मालमत्ता कर वसुली ९५.५६ टक्क्यांवर

## मालमत्ताधारकांनी 'अभय योजने'ला प्रतिसाद दिल्याने झाली ऐतिहासिक वसुली

प्रतिनिधी । चोपडा

**नगरपरिषद प्रशासनाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कर वसुलीसाठी राबवलेली धडक मोहीम आणि 'अभय योजनेला नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यावर्षी विक्रमी कर वसुली झाली आहे. मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने कडक पावले उचलत थकबाकीदारांविरुद्ध कारवाई केल्याने वसुलीचा टक्का लक्षणीयरीत्या वाढला आहे.**



वसुलीची सविस्तर आकडेवारी (२०२५-२६) नगरपरिषदेने यावर्षी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि गाळे भाडे यात मागील वर्षांच्या तुलनेत मोठी वाढ नोंदवली आहे: मालमत्ता कर (घरपट्टी) मागणी ८९०.१० लाख - वसूल - ८५०.६४ लाख - टक्केवारी - ९५.५६% पाणीपट्टी- मागणी- ४६४.१३ लाख - वसूल- २५१.११ लाख -टक्केवारी - ५४%. दुकान गाळे भाडे - मागणी - २३३.४५ लाख - वसूल - २०९.४९ लाख - टक्केवारी - ८९.७४%

३१ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत राबवण्यात आलेल्या अभय योजनेमुळे शेवटच्या दिवशी कर भरण्यासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. केवळ शेवटच्या एका दिवसात १५३.५३ लाख रुपयांची विक्रमी वसुली झाली. मालमत्ता कर: १०९.३६ लाख, पाणीपट्टी: १९.६ लाख, दुकान भाडे: २५.११ लाख. वसुलीची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रशासनाने केवळ आवाहन न करता कडक कारवाईचे धोरण अवलंबले होते. मोहिमेदरम्यान थकबाकी न भरणाऱ्या २२० व्यापारी गाळ्यांना सील ठोकण्यात आले, तर पाणीपट्टी थकवणाऱ्या ४०९ ग्राहकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात आले.

### सामूहिक प्रयत्नांचे यश : मुख्याधिकारी झंवर

यावर्षीची विक्रमी वसुली हे सामूहिक प्रयत्नांचे यश आहे. शहरातील विकासकामांसाठी कर भरणा होणे आवश्यक असते. स्थानिक पत्रकार आणि वृत्तपत्रांनी या मोहिमेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार-प्रसार करून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच, नगरपरिषदेचे सर्व अधिकारी आणि वसुली कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतल्यामुळेच आपण हे उद्दिष्ट गाठू शकलो आहोत. शहरातील नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या सहकार्याबद्दल मी प्रशासनातर्फे त्यांचे मनापासून आभार मानतो.

### पाणीपट्टीसाठी मे महिन्यात विशेष मोहीम

मालमत्ता कराच्या तुलनेत पाणीपट्टीची वसुली ५४% असून ती कमी आहे. ही टक्केवारी वाढवण्यासाठी नगरपरिषदेने मे महिन्यात विशेष वसुली मोहीम राबवण्याचे नियोजन केले आहे. नागरिकांनी नळ जोडणी खंडित होण्याची कारवाई टाळण्यासाठी त्वरित पाणीपट्टी भरावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या कठोर भूमिकेमुळे थकबाकीदारांनी नगरपालिकेत धाव घेऊन कराचा भरणा केला.

# व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने डॉ. वंदना वाघचौरे सन्मानित

प्रतिनिधी । भुसावळ

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत आयोजित राष्ट्रपिता महात्मा गांधी राष्ट्रस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथे उत्साहात पार पडला. आर्या बहुउद्देशीय सेवा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. वंदना उर्मेंद्र वाघचौरे यांना व्यसनमुक्ती क्षेत्रातील उल्लेखनीय व निःस्वार्थ कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी राष्ट्रस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. . या कार्यक्रमास रामदास आठवले, अॅड. राहुल नार्वेकर, मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, लोकसभा सदस्य अरविंद सावंत, मुंबई महापौर रितू तावडे, डॉ. हर्षदीप कांबळे, दीपा मुधोळ मुंडे यांची उपस्थिती होती.

# दहिगाव जिल्हा परिषद शाळेची उन्हाळी शैक्षणिक सहल उत्साहात

प्रतिनिधी । यावल

**येथील जिल्हा परिषद शाळा दहिगाव शाळेचे विद्यार्थी व शिक्षकांची उन्हाळी सहल दि.२८ मार्च रोजी सकाळी ६ वाजता खामगाव, नांदुरा, शेगाव या प्रेक्षणीय व धार्मिक स्थळी तीन एसटी बसेसने जवळपास १४८ विद्यार्थ्यांची एक दिवशीय सहल निघाली. प्रथम नांदुरा येथे बालाजी मंदिर व हनुमान मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर शेगाव येथील गजानन महाराजांच्या पवित्र तीर्थक्षेत्र विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे १९ व्या शतकात प्रकट होती.**



झालेल्या महाराजांचे समाधी स्थळ असून येथील संस्थांचा कारभार अतिशय शिस्तबद्ध स्वच्छ व भक्तांसाठी सेवाभावी असून येथे विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर खामगाव येथील नामांकित कंपनीचा बिस्किट कारखाना पाहिला बिस्किट कशाप्रकारे तयार केली जातात, हे प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना पाहावयास मिळाले. सहलीतील सर्व विद्यार्थ्यांना बिस्कीट पुडे वाटप करण्यात आली. हा प्रकल्प स्थानिक उद्योग निर्मिती मोलाची भूमिका बजावतो, असे चर्चादरम्यान निदर्शनास आले पण तिच्या प्रवासादरम्यान मुक्ताईनगरच्या नामांकित हॉटेलमध्ये विद्यार्थ्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला. सहलीच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सरिता जाधव, शिक्षक पंकज पाटील, किशोर शिसोदे, सोनाली चौधरी, विमल बारेला, विजय पाटील, रामेश्वरी बडगुजर सोनाली साळुंखे यांनी परिश्रम घेतले.

# 'सर्वेश्वर'ची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद : डॉ.राजेश वाल्डे

प्रतिनिधी । पारोळा

**गेल्या १० वर्षापासून अविरतपणे येथील सर्वेश्वर बहुउद्देशीय विकास संस्था क्षय रुग्णांसाठी विविध उपक्रम राबवत असते. त्याचबरोबर शासनाच्या क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमात सहभागी होऊन स्वयंसेवक म्हणून जबाबदारी स्वीकारत असते.**



जागतिक क्षयरोग दिन तालुक्यातील रुग्णांचे मनोधैर्य उंचावे त्यांच्या मनातील भीती दूर व्हावी. या भावनेतून त्यांचा सत्कार केला. ही संस्थेची बांधिलकी कौतुकास्पद असल्याचे कुटीर रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश वाल्डे यांनी सांगितले.

दि.२४ रोजी कुटीर रुग्णालयात जागतिक क्षयरोग दिन व तसेच टी.बी.मुक्त भारत अभियान अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा क्षयरोग अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.जिनेंद्र पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत सोनवणे, डॉ.गिरीश जोशी, सर्वेश्वर बहुउद्देशी विकास संस्थेचे अध्यक्ष संजय पाटील, सचिव आशा पाटील, सदस्य शेखर पाटील, रुग्णालय कर्मचारी करुणा पवार, राखी बडगुजर, मनिषा महाले, सोनाली गुरव, श्रीमती चांगरे,ईश्वर आखाडे .भगवान चौधरी,राजेंद्र चंद्रात्रे, किशोर पाटील, बबन महाजन, प्रेम वानखेडे , क्षयरुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

## थोडक्यात

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी, चालक फरार

**भुसावळ ।** येथील पूजा कॉम्प्लेक्स परिसरात दि.१ एप्रिल रोजी दुपारी भरधाव येणाऱ्या कार चालकाने एका दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली.त्यानंतर तो घटनास्थळावरून फरार झाला. नागरिकांनी तत्काळ रुग्णवाहिकेला माहिती देऊन जखमी दुचाकीस्वाराला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर काहीकाळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

### 'माझं गाव आरोग्य संपन्न'वर कार्यशाळा उत्साहात

**चाळीसगाव ।** येथे आरोग्य विभागाकडून राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या कार्यक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या आदेशानुसार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर यांच्या मार्गदर्शनानुसार या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान २ अंतर्गत अंतिम फेरीसाठी प्रादेशिक सर्वेक्षण समितीची भेट



प्रतिनिधी । चोपडा

**राज्यभर राज्य परिवहन महामंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या हिंदूहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान २ अंतर्गत चोपडा बसस्थानकातील स्वच्छता व बसस्थानकाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या विकासाभिमुख उपक्रमांची माहिती मूल्यांकन समितीने घेतली. यात प्रादेशिक व्यवस्थापक चेतना खिरवाडकर, प्रादेशिक सांख्यिकी अधिकारी संतोष शेगोकरसह सर्व्हेक्षणासाठी स्थानिक पत्रकार चंद्रकांत पाटील, सज़य सोनवणे व प्रवाशी मित्र प्रभाकर महाजन यांच्या संयुक्त समितीने चोपडा आगारास भेट देवुन संपूर्ण बसस्थानक, आगाराची पाहणी करून सर्वेक्षण केले.**

चोपडा आगाराचे बदलेले रुप, स्वच्छता, नीटनेटकेपणामुळे महाराष्ट्रात अव्वल असलेला चोपडा आगार इतर आगारांसाठी आदर्श ठरत असून स्पर्धेत टिकण्यासाठी सातत्य ठेवले आहे, असे गौरवोद्गार काढुन यासाठी मेहनत घेणाऱ्या आगार प्रमुख महेंद्र पाटील यांच्यासह चालक/ वाहक/यांत्रिक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी आगार प्रमुख महेंद्र पाटील यांनी समिती सदस्यांचे स्वागत केले, यावेळी आगारातील अधिकारी सिध्दार्थ चंदनकर, नितीन सोनवणे, सागर सावंत, ईश्वर चौधरी, चंद्रभान रायसिंग, नरेंद्र जोशी, विजय सोनवणे, संदिप पाटील, रिजवान सैय्यद, गव्हरलाल बाविस्कर, अशोक पाटील, सुरक्षा रक्षक कैलास धनगर , संदिप पाटील, प्रभाकर माळी, रिना पाटील, राजश्री परदेशी, सविता कोळी, वृषाली बैसाणे, निर्मला सोनवणेंसह कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक व आभार भगवान नायदे यांनी मानले. तर प्रवाशी मित्र प्रभाकर महाजन यांनी चोपडा आगाराच्या दर्जेदार सेवा बदललेल्या चेहऱ्यासाठी आगार प्रमुख महेंद्र पाटील व कर्मचारी घेत असलेली मेहनतीचे कौतुक केले.

# डोणगाव विकासोची १०० टक्के कर्जवसुली

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील डोणगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीने ३१ मार्च २०२६ पूर्वी १०० टक्के कर्ज वसुली केली आहे. संस्थेने १०० टक्के कर्ज वसुली केल्याने विभागीय उपव्यवस्थापक पी.एन. राणे, क्षेत्रीय अधिकारी व्ही. बी. सपकाळे संस्थेचे चेअरमन साहेबराव पाटील बँकेचे कर्मचारी, तुषार चौधरीयांचे बँकेच्या सर्व संचालकांनी अभिनंदन कले.

# शेंदुर्णीच्या कन्या पल्लवी मांडोळे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । शेंदुर्णी

येथील आ.ग.र.ग. माध्यमिक विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आणि माजी मुख्याध्यापिका विमल बाबुलाल मांडोळे व बाबुलाल मांडोळे यांच्या सुकन्या व काळखेडे जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या उपक्रमशील शिक्षिका पल्लवी मांडोळे यांना नुकताच पुणे येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृहात ध्येय एज्युकेशन फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय एज्युकेशन आयकॉन- २०२६ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पल्लवी



मांडोळे यांनी 'झेप यशाची' आणि 'स्पर्श एक जाणीव एक सुरक्षा' या उपक्रमांद्वारे शिक्षण क्षेत्रात जिल्हास्तरावर प्रथम येऊन उल्लेखनीय कार्य केले आहे.

या कार्याची दखल घेण्यात आली. हा अतिशय मानाचा पुरस्कार पिंपरी-चिंचवडच्या उपमहापौर शर्मिला बाबर, उपजिल्हाधिकारी शुभम पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, शिक्षण मंडळ सभापती नानासाहेब शिवले आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रेय वारे गुरुजी आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पल्लवी मांडोळे यांना गौरविण्यात आले.

# गायीला सेवा, सुरक्षा-सन्मानासाठी २७ रोजी महाशोभायात्रेची तयारी

प्रतिनिधी । चोपडा

**देशभरातील सर्व संतांनी गो-सन्मान योजना हाती घेतली आहे. संतांच्या आदेश लक्षात घेऊन येथील गो भक्तांनी २७ एप्रिल हा दिवस गो सम्मान दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. दि. १ एप्रिल २०२६ रोजी गोभक्तांची बैठक मोठ्या उत्साहात श्रीराम नगर येथे संपन्न झाली.**




या सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन २७ एप्रिल रोजी १० हजार सह्यांचे निवेदन राज्य व केंद्र सरकार तथा राष्ट्रपती महोदय यांना तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांचे मार्फत मागाण्यांचे निवेदन प्रार्थना पत्र देण्यात येणार आहे. प्रार्थना पत्रात गायीला राष्ट्रमातेचा दर्जा द्यावा, या मागणी सोबत गोहत्या बंदीचा कडक कायदा लागू करा व गायीची सेवा व्हावी म्हणून उचित न्याय व्हावा ,अशा मागण्या असतील. सदरील प्रार्थना पत्र देण्यासाठी दि २७ एप्रिल २०२६ रोजी श्रीराम मंदिर गांधीजी चौक चोपडा येथे सकाळी गोसेवक, संत, शेतकरी हजारोच्या संख्येने उपस्थित राहतील. भजन कीर्तन करत जय गोमाता जय गोपाल असा गजर करत चोपडा शहरातील बाजारपेठेतून मार्गक्रमण करत तहसीलदार कचेरीत शोभायात्रा पोहचून प्रार्थना पत्र देतील. बैठकीत के. डी. चौधरी, लखन तेली, डी.व्ही.पाटील, कोळी अप्पा,सतीश पाटील, टी.एम.चौधरी,राजू बडगुजर, देवकांत के चौधरी, जयदेव देशमुख, किरण चौधरी, रवी पाटील, प्रा सूर्यकांत चौधरी, श्रीराम नगर भागातील महिला वर्ग धनराज मराठे आदी गोभक्त उपस्थित होते. शोभा यात्रेच्या तयारीसाठी गांधीजी चौकातील श्रीराम मंदिरात सायं ६वाजता होणार आहे. या बैठकीला गोभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गोभक्तांद्वारे करण्यात आले आहे.


# पारोळा येथील भुईकोट किल्ल्यावर राजा शिवछत्रपती परिवारातर्फे स्वच्छता मोहीम

## ● ८६ वी स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवून शिवकार्याचा जपला वारसा

प्रतिनिधी । पारोळा

**गड-किल्ले संवर्धनाचे पवित्र कार्य करणाऱ्या राजा शिवछत्रपती परिवार, जळगाव यांच्या वतीने दि.२९ मार्च रोजी पारोळा येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यावर ८६ वी स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवण्यात आली. या परिवाराने आतापर्यंत महाराष्ट्रातील विविध गड-किल्ल्यांवर सातत्याने स्वच्छता आणि संवर्धन मोहिमा राबवून शिवकार्याचा वारसा जपला आहे. मोहिमेचा प्रारंभ आणि वंदन सकाळी ठीक ८ वाजता मोहिमेला सुरुवात करण्यात आली.**

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आणि पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयघोषाने संपूर्ण किल्ला परिसर दणाणून गेला होता. श्रमदान आणि स्वच्छता कार्य किल्ल्याच्या सौंदर्गीकरणासाठी उपस्थित ५५ ते ६० मावळ्यांनी मोठ्या उत्साहात श्रमदान केले. किल्ल्याच्या बुरुज व तटबंदीला धोकादायक काटेरी झाडे, अनावश्यक झुडुपे आणि साचलेला पालापाचोळा एकत्रित गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात



आली. या मोहिमेमुळे किल्ल्यातील बालेकिल्ल्याचा ऐतिहासिक परिसर स्वच्छ आणि सुंदर झाला आहे. सुशोभीकरण आणि नागरिकांचे कर्तव्य सध्या पारोळा भुईकोट किल्ल्याच्या सुशोभीकरणाचे काम अतिशय सुंदर, सुबक आणि नक्षीदार पद्धतीने करण्यात येत आहे. हे काम पाहून किल्ल्याचे मूळ वैभव पुन्हा उजळून निघत असल्याचे समाधान शिवप्रेमींनी व्यक्त केले. मात्र, हे सुशोभीकरण टिकवण्यासाठी आणि किल्ल्याचे पावित्र्य जपण्यासाठी पर्यटकांनी व स्थानिक नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. हे सुशोभीकरण आणि किल्ल्याचे पावित्र्य जपले पाहिजे, असे आवाहन यावेळी राजा शिवछत्रपती परिवारच्या वतीने करण्यात आले. सहभागी मावळे व अल्पोपहार या ८६ व्या मोहिमेसाठी जळगावसह धुळे, मुकटी, चोपडा, भुसावळ, चाळीसगाव, अमळनेर, बहादरपूर आणि स्थानिक पारोळा परिसरातील मावळे उपस्थित होते. या मावळ्यांसाठी काही दानशूर शिवप्रेमींनी स्वखर्चाने चहा, पाणी, नाश्ता आणि उन्हाचा तडाखा लक्षात घेता ताकाची उत्तम व्यवस्था केली होती. अभिवादन आणि निष्ठा राजा शिवछत्रपती परिवाराच्या वतीने आतापर्यंत अनेक गड-किल्ल्यांवर अशा मोहिमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# साकळीत किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी

## लाठ्या-काठ्या, लोखंडी हुकने मारहाण

प्रतिनिधी । यावल

**तालुक्यातील साकळी येथे मुलांच्या किरकोळ वादाचे रूपांतर मोठ्या संघर्षात होऊन दोन गटात जोरदार हाणामारी झाल्याची घटना दि.२९ मार्च रोजी रात्री घडली. या घटनेत एकाच कुटुंबातील सदस्यांना लाठ्या-काठ्या आणि लोखंडी हुकने गंभीर मारहाण करण्यात आली. जखमींवर जळगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

फिर्यादी शिवदास शेनपडू पाटील (वय ६२, रा. थोरगव्हाण ता. यावल) हे सध्या थोरगव्हाण येथे आपल्या कुटुंबासह राहतात. दि.२९ मार्च रोजी सकाळी त्यांचा लहान मुलगा संभाजी हा साकळी येथे बाजारात गेला असता, त्याचा अमोल भगवत पाटील याच्याशी किरकोळ वाद झाला. या वादाचा राग मनात धरून रात्री ९ वाजेच्या सुमारास संशयित आरोपी अमोल भगवत पाटील, दिगंबर संतोष पाटील, अक्षय अशोक पाटील व इतर काही जणांनी फिर्यादींच्या घरावर चाल केली. संशयितांनी फिर्यादींच्या घरात शिरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद सोडवण्यासाठी आलेले फिर्यादींचे लहान भाऊ माणिक शेनपडू पाटील यांना संशयितांनी लाकडी दांडक्याने व लोखंडी हुकने बेदम मारहाण केली.